पुढारी

# विद्यापीठ परीक्षांबाबत पुढील आठवड्यात निर्णय शक्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) पुढील आठवड्यात परीक्षेसंदर्भात निर्देश प्राप्त झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठासह राज्यातील सर्वच विद्यापीठांच्या परीक्षांबाबत निर्णय होण्याची शक्यता असल्याचे विद्यापीठ सूत्रांनी सांगितले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून महाविद्यालये बंद आहेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने मार्च-एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा पुढे ढकलल्याचे संबंधित घटकांना यापूर्वीच कळविले आहे.

राज्य सरकारने विदयापीठ परीक्षांसंदर्भात सहासदस्यीय समिती नेमली आहे. समितीची उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यासमवेत बैठक झाली आहे. यूजीसीच्या निर्देशानुसार गठित समिती राज्यातील सर्व कुलगुरूंबरोबर संवाद साधणार आहे. परीक्षेबाबतच्या शिफारसी ही समिती राज्य सरकारला सादर करेल. राज्य शासनाकडून राज्यपाल यांना शिफारसी सादर केल्या जातील. त्यानंतर परीक्षेसंदर्भातील अंतिम निर्णय शासन परिपत्रकाद्वारे घोषित केला जाणार असल्याचे समजते.

# 'लॉ'च्या पहिल्या वर्षाचे निकाल विद्यापीठाकडून जाहीर

## पहिले सेमिस्टर : फेब्रुवारीत झाली होती परीक्षा



कोल्हापूर, ता. २७ : कायदा (लॉ) विषयाच्या पहिल्या वर्षाचे निकाल शिवाजी विद्यापीठाने जाहीर केले आहेत. कोरोनाच्या संचारबंदीमुळे निकाल लावण्यात अडथळे आले असले तरी परीक्षा विभागाने निकाल लावले.

कायदा विषयाच्या नवीन विद्यार्थ्यांची परीक्षा यंदा ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान झाली. या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया महापुरामुळे पुढे गेली होती. परिणामी त्यांची ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये परीक्षा होऊ शकली नाही. पहिल्या सेमिस्टरच्या सहा विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्राध्यापकांना पुरेसा कालावधी आवश्यक होता. या वर्षाच्या परीक्षा उशिरा घेण्यात आल्या. त्या फेब्रुवारीमध्ये झाल्यानंतर पेपर तपासणीचे काम सुरू असतानाच कोरोनाच्या संचारबंदीमुळे निकाल लावण्यात अडथळा निर्माण झाला.

विद्यापीठाच्या ५९१ परीक्षा ऑक्टोबरमध्ये झाल्या होत्या. बहुतांशी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले असले तरी कायदा विषयाच्या प्रथम वर्षाचे निकाल जाहीर झाले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांतून निकाल कधी जाहीर होणार, अशी विचारणा होत होती. परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांची अस्वस्थता लक्षात घेत निकाल जाहीर करण्यात हालचाली केल्या. चार दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाले.

# शुल्क माफीची एनएसयूआयची मागणी

कोल्हापूर : लॉकडाउनमुळे कॉलेज व विद्यापीठाच्या परीक्षा खोळंबल्या आहेत. राज्य सरकारने, या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे, अशी मागणी एनएसयुआयच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत व पालकमंत्री सतेज पाटील यांच्याकडे केली आहे. 'शैक्षणिक सत्र पुढे गेल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. परीक्षा ऑनलाइन घेण्याचे झाल्यास ग्रामीण विद्यार्थी व तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेचा विचार करावा,' अशी माहिती अक्षय शेळके यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.